महाराष्ट्र शिक्षण सेवा (प्रशासन शाखा) मधील अधिकाऱ्यांच्या सर्वसाधारण <u>बदल्यांमध्ये अंशात: बदल करण्याबाबत</u>
अधीक्षक व तत्सम, गट-ब

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन आदेश क्रमांक : बदली ३११९/प्र.क्र ३७/प्रशा-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक:- १ ऑगस्ट, २०१९

<u>संदर्भ :</u> शा.शि. व क्री.विभाग, शासन आदेश क्र. बदली-३११९/प्र.क्र.३७/प्रशा-२, दिनांक २८.०५.२०१९

शासन आदेश :-

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार दिनांक ३१ मे, २०१९ रोजी तीन वर्षाचा कालावधी पूर्ण करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या बदलीचे आदेश दिनांक २८.०५.२०१९ रोजी निर्गमित करण्यात आले आहेत. त्यामध्ये काही अधिकाऱ्यांच्या पदस्थापनेत अंशात: बदल करण्याचा निर्णय शासन स्तरावर घेण्यात आला आहे. नागरी सेवा मंडळ क्र.१ यांनी सक्षम प्राधिकारी यांना शिफारस केली होती व सक्षम प्राधिकाऱ्यांनी दिलेल्या मान्यतेनुसार खालील तक्त्यात नमूद अधिकाऱ्यांच्या बदलीच्या पदस्थापनेमध्ये त्यांच्या नावासमोर स्तंभ क्रमांक-४ मध्ये दर्शविलेल्या सुधारित पदस्थापनेच्या ठिकाणी पदस्थापना करण्यात येत आहे.

अ. क्र.	अधिकाऱ्याचे नाव व पदनाम	दि.२८.०५.२०१९ च्या आदेशान्वये करण्यात आलेली पदस्थापना	अंशात: बदलीनंतरची पदस्थापना	अभिप्राय
१	२	३	४	५
१	श्री. नितीन प्रतापराव पाटील, अधीक्षक, वेतन व भ.नि.नि. पथक (माध्य.) धुळे	अधीक्षक, वेतन व भ.नि.नि. पथक (प्राथ.) धुळे	कनिष्ठ प्रशासन अधिकारी, विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, नाशिक	विनंती नुसार, श्रीमती भोर यांच्या विनंती बदलीने रिक्त होणाऱ्या पदावर

२. संबंधित अधिकारी हे दिनांक २८.०५.२०१९ रोजीच्या आदेशानुसार संबंधित पदावर रुजू झाले असल्यास, हे आदेश अंमलात येणार नाहीत. आयुक्त (शिक्षण) यांनी याबाबत प्रथम खात्री करून नंतर वरीलप्रमाणे आदेश निर्गमित करावेत.

३. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी या आदेशाप्रमाणे बदली झालेले अधिकारी विहित कालावधीत दिलेल्या पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू होतील, याची खातरजमा करावी व याबाबतचा अहवाल शासनास सादर करावा.

४. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१९०८०११७४३२०३६२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Santosh Basaveshwar Mamadapure

Digitally signed by Santosh Basaveshwar Mamadapure
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education and Sports, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=3bfe111652996d95372924b1d22cdf88b33dfa2a3de3d8ea011b7d83adc40cb6, serialNumber=557abe7a7194ec5ddc74df537d7d57a9dbda20b1937a2e41983c35f6a38b6ad8, cn=Santosh Basaveshwar Mamadapure
Date: 2019.08.02 12:11:10 +05'30'

(संतोष ममदापुरे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
२) संबंधित शिक्षण संचालक
३) संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक
४) संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
५) संबंधित शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद
६) संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी पुणे / नाशिक
७) संबंधित अधिकारी (शिक्षण आयुक्तालयामार्फत)

प्रत माहितीस्तव

१) मा.मंत्री, शालेय शिक्षण यांचे विशेष कार्य अधिकारी.
२) अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे स्वीय सहायक
३) निवडनस्ती, प्रशा-२